प्रेस नोट                दिनांक १६/०३/२०२२

यातील फिर्यादी यांच्या मयत भावाच्या मृत्यु दाखल्यातील चुकीचे नांवात बदल करण्याकरीता यातील आलोसे यांनी फिर्यादी यांचेकडे रु. ५,०००/— रक्कमेच्या लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु. ४,०००/— लाचेची रक्कम स्विकारली म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| १ | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग. |
| २ | गुन्हा नोंद क्रमांक | १६/२०२२, |
| ३ | कलम | कलम ७, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ |
| ४ | आरोपीचे नांव व कार्यालय | मिलींदकुमार सिताराम संखे, वय ५४ वर्षे, व्यवसाय—नोकरी, मेडीकल रेकॉर्ड टेक्निशियन (वर्ग—३)<br>कार्यालय :— भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉस्पिटल, कांदिवली पश्चिम मुंबई ४००१०३. |
| ५ | मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये ५,०००/— |
| ६ | तडजोडीअंती स्विकारलेली रक्कम | रुपये ४,०००/— |
| ७ | थोडक्यात हकीगत | यातील फिर्यादी यांच्या भावास उपचाराकरीता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉस्पिटल, कांदिवली पश्चिम येथे दाखल करण्यात आले होते. परंतु उपचारादरम्यान त्यांचा मृत्यु झाला होता. मयत भावाचे मृत्यु प्रमाणपत्र घेण्यासाठी फिर्यादी हे हॉस्पिटल येथे गेले असता प्रमाणपत्रात भावाचे नावात चुक असल्याचे फिर्यादी यांना आढळुन आले. सदर नावात बदल करण्यासाठी आलोसे यांनी फिर्यादी यांना रूपये ५,००० ची मागणी केली.<br>फिर्यादी यांना नमुद आलोसेंना लाचेची रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे दिनांक १५/०३/२०२२ रोजी लेखी तक्रार केली.<br>प्राप्त तक्रारीस अनुसरून केलेल्या पडताळणीत आलोसे यांनी रूपये ५,००० ची मागणी करून तडजोडीअंती रूपये ४,००० अशी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक १६/०३/२०२२ रोजी केलेल्या सापळा कारवाई दरम्यान यातील आलोसे यांना फिर्यादी यांचेकडुन रू. ४,०००/— रक्कमेची लाच स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले. |

(संजय पाटील)
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबधंक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क—** लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ४०००३०
**संकेतस्थळ**—acbmaharastra.gov.in
**ईमेल—** १)acbwebmail@mahapolice.gov.in
२)addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.
**ऑनलाईन तक्रार अर्ज**—www.acbmaharastra.net. **टोलफ्री क्र.** १०६४
**दुरध्वनी क्र.** ०२२ २४९२१२१२ **फॅक्स. क्र.** ०२२२४९२२६१८, **व्हॉटसअप क्र.** ९९३०९९७७००